पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

# प्रेसनोट क्र. ०४ दिनांक ०६/०१/२०२३

# बतावणी करुन फसवणूक करणाऱ्या चार आरोपींना अटक करण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश

दि.३०/१२/२०२२ रोजी १५.४५ वा. ते १६.१५ वाजताचे सुमारास टेन नाका ते सातिवली गावचे हददीत फिर्यादी हे सफाळा येथे जाण्यासाठी टेन नाका येथे थांबल्या असताना ४० ते ४५ वर्ष वयोगटातील दोन इसम फिर्यादीजवळ चालत येवुन सफाळा येथे कसे जायचे याबाबत विचारपुस करत होते. त्याचदरम्यान त्यांचे दोन साथीदार वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष असे कारमधुन येवून फिर्यादीस सफाळा येथे कसे जायचे हे विचारत असताना फिर्यादी ही मी देखील सफाळा येथे जात आहे. त्यावेळी नमुद इसमांनी आमचेसोबत चला असे सांगितल्याने फिर्यादी त्यांचे कारमध्ये बसल्यानंतर प्रवासादरम्यान कारमधील दोन इसमांनी फिर्यादीस पुढे एका बाईचा मर्डर झालेला असुन तिचे ७० लाख रुपये लुटुन नेलेले आहेत. त्यामुळे पोलीस चेकींग सुरु आहे अशी फिर्यादीला खोटी बतावणी करुन सोन्याचे दागिने काढुन ठेवावे लागतील असे सांगितले. फिर्यादीने त्यांचेजवळ असलेले सोन्याचे दागिने त्यांनी दिलेल्या एका लिफाफयामध्ये ठेवुन दिल्यानंतर पुढे काही अंतर फिर्यादीस एक लिफाफा त्यात एक सफेद रंगाची मोबाईल चार्जिंगची वायर, एक कोणत्यातरी धातुचा तुकडा, व शिश्याचा तुकडा देवुन फिर्यादीची एकुण ३,२४,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने घेवून फसवणुक केली म्हणुन मनोर पोलीस ठाणे येथे I ३१४/२०२२ भादविसं कलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आदेशान्वये श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. उमेश पाटील, पोलीस निरीक्षक, मनोर पोलीस ठाणे व श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना वेगवेगळी पथके तयार करुन गुन्ह्याचा तपास करण्याबाबत सुचना दिल्या. नमुद गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कोणताही पुरावा अथवा धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण तांत्रिक तपास करुन चार संशयीत इसमांना ताब्यात घेवून त्यांची कसून चौकशी केली असता नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. आरोपींना अटक केली असून त्यांचेकडून एकुण ३,२४,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर व श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे आदेशान्वये श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा पालघर, पोउपनि/गणपत सुळे, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा पालघर व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी पालघर जिल्ह्यातील सर्व नागरीकांना आवाहन केले आहे की, वरील प्रकारचे बतावणीच्या गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ होत असल्याने अशा प्रकारे अनोळखी व्यक्तीवर कोणत्याही प्रकारचा विश्वास ठेवू नये व अशा प्रकारांना बळी पडू नये. तसेच असे बतावणी करणारे संशयीत इसम मिळून आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाणेस, डायल ११२ अथवा नियंत्रण कक्ष पालघर येथे कळवावे.

**नियंत्रण कक्ष हेल्पलाईन क्रमांक : ०२५२५-२०५३००/९७३०७११११९/९७३०८११११९/८६६९६०४१००**